

# सुचल्या जेव्हा ओळीं

शिरीष मोराणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# सुचल्या जेव्हा ओळीं

काव्यसंग्रह

शिरीष पुरूषोत्तम मोराणकर

# सुचल्या जेव्हा ओळीं

**कवी : शिरीष पुरूषोत्तम मोराणकर**
बी-३/१०२,इंद्रप्रस्थ संकुल
गोल्डन पार्क फेस २ मागे
बेतुरकरपाडा, कल्याण (पश्चिम), ४२१३०१
सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. 9920601137
ई मेल shirish.morankar@gmail.com

मुखपृष्ठ चित्र- सौ. प्राजक्ता मोराणकर--जोगळेकर
अंतर्गत छायाचित्रे- सोनाली जाधव

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १० मार्च २०२२ (फाल्गुन शु. अष्टमी शके १९४३)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत

## थोडा वारसा बाकी आरसा



साधारणपणे १९७२ पासून नकळतच कविता लेखन सुरू झाले. तेव्हा कल्पनाही नव्हती की हा छंद इतकी वर्षे टिकेल आणी कधीकाळी एखादा कवितासंग्रह प्रकाशित करु.

थोडा वारसा अस लिहीण्यामागच कारण म्हणजे माझ्या सुदैवाने मला बालकवी ठोमरे यांचा वारसा मिळाला आहे. बालकवी ठोमरे माझे आजोबा. माझ्या आईचे सख्खे काका. अर्थात ठोमरे घराण्यातील अपमृत्यूंमुळे हा वारसा फक्त सांगण्यापुरताच बाळगू शकतो. पण त्यांचे आशीर्वाद असल्याशिवाय माझ्या कविता आज हजारांच्या टप्प्यापर्यंत पोहोचूच शकल्या नसत्या.

आता बाकी आरसा म्हणजे कविता लिहील्यानंतर आपणच तिच्याकडे आरशातल्या प्रतिबिंबासारख पाहात तिच्यातले दोष दूर करत तिच्यात परीवर्तन करीत राहाणं. आज इतक्या वर्षांनंतर सुध्दा मला कविता कळली आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. सतत वाचत राहाण आणि लिखाणात सुधारणा करीत राहाण हाच आता नित्य परीपाठ आहे. माझ्या कविता इतरांना आवडतात हा माझ्यासाठी बहुमान आहे.

कविता लिहील्यानंतर ती इतरांनी वाचावी ही अपेक्षा असतेच. माझ्या निवृत्तीनंतर माझ्या चारोळ्यांचे "मनोगत" नावाने पुस्तिका छापून माझ्या कुटुंबीयांनी ती अपेक्षा पूर्ण केली . तसेच २०१७ साली माझे मेहुणे श्री. श्रीपाद डंके यांनी "अस्वस्थ मनाच्या ओळी" या नावाने १०० कवितांचे पुस्तक प्रकाशित केले व ते परीचितांमधे वितरितही केले. मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

सध्याचे युग घरबसल्या जगाची सफर करण्याचे आहेत. घरबसल्या शॉपिंग, घरबसल्या हजारो लोकांशी संपर्क करण्याचे आहेत. ई साहीत्य या प्लॅटफॉर्म वर असलेली असंख्य प्रकाशने पाहून आणि हजारो जणांशी जोडले जाण्याची क्षमता पाहून मीही आयोजकांशी संपर्क साधला. त्यांच्या प्रतिसादातूनच हा "सुचल्या जेव्हा ओळी" हा काव्यसंग्रह आकाराला येत आहे. ई साहित्याच्या आयोजकांचा मी अत्यंत आभारी आहे. ई साहित्याच्या वाचकांना कविता आवडतील अशी अपेक्षा.

शिरीष पुरूषोत्तम मोराणकर

अर्पणपत्रिका

अजून त्या लहान आहेत..
अजाण आहेत..
जाणत्या वयात त्यांनी
खूप वाचन करुन नेणतं व्हावं
अशी अपेक्षा आहे
त्या चिमण्या नातींना

चि. निमिषा, चि. स्पृहा
आणि चि. मृण्मयीला....

हा संग्रह सस्नेह .........

## अनुक्रम


१. मज सुचल्या जेव्हा ओळी
२. आत्ममग्न
३. अतिथी
४ . कानोसा
५. मजेत गावे
६. मौनाचे स्वर
७. थेंबकळ्या पावसाच्या
८ . आता न कुठली भीती
९. संगत
१०. पाखरू
११. नाही धर्माचा आचार
१२. सर्कस
१३. डोह
१४. स्वप्न
१५. आभाळ साक्ष
१६ . जिप्सी
१७. ऐल नाही
१८. सदैव असतो
१९. बंद बंद असते
२०. मेघ
२१. किनार ओली होती
२२. हळवे सुगंध
२३. मैत्री

२४. *झुला*
२५. *वर शांत शांत*
२६. *नितांत*
२७. *रांगोळी*
२८. *छाया*
२९. *अथांग सागर*
३०. *स्वर गहिवरलाआव्हान*

## १. मज सुचल्या जेव्हा ओळी

मज सुचल्या जेव्हा ओळी
तो सूर्य थबकला होता
अन् उजाडण्यापूर्वीचा
नभी काळोख दाटला होता
मज सुचल्या जेव्हा ओळी
पाऊस थांबला होता
अन् मनी ओलसर तेव्हा
मृद् गंध पसरला होता
मज सुचल्या जेव्हा ओळी
थंडीची दुलई होती
अन् शाल हिरवळीवरती
पसरली धुक्याची होती
मी लिहील्या जेव्हा ओळी
शब्दांशी जोडीत नाते
निःशब्द मनाच्या तेव्हा
आभाळ साक्षीला होते

१३/०६/२१

## २. आत्ममग्न

आभाळ आंधळे झाले
अन् स्वप्नदिलासा सरला
अंधारल्या रात्रीत का
आज अबोला उरला

आर्त सूर मंद वात
चंद्रही फिका फिका
अबोल आज वाटती
शांत साऱ्या तारका


दहा दिशास व्यापते
एक गूढ आर्तता
अबोल या मनी झरे
खोल खोल शांतता

शांततेत आज का
मी अबोल-अबोल सा
अंधारल्या रात्रीत या
मीच आत्ममग्नसा

ही आत्ममग्नता
मनात खोल झिरपते
ही अबोल अबोलता
मनासवेच बोलते

का न कळे मनास या
अंधार आज भावतो
हा अबोला न बोलता
खूप खूप बोलतो

१३/०६/२१



## ३. अतिथी

आत्मा हा अतिथी
देहाच्या कुटिरी
श्वास दोन श्वास
विसावला

ठाऊक आपुला
युगाब्द प्रवास
तरीही कौतुका
आसावला

अस्तितत्त्व युगांचे
भास हे क्षणांचे
तरीही जीवनी
स्थिरावला

श्वासांचे हे ओझे
ठेऊनिया मागे
जाणे या पुढल्या
प्रवासाला

आत्मा हा अतिथी
देहाच्या कुटिरी
श्वास दोन श्वास
विसावला
विसावला.....

१७/०९/२१

## ४ . कानोसा

घेता कानोसा नभाचा
चंद्र चांदणे उधळी
ग्रह तारकांचे धन
मेघा मेघास उजळी

घेतो कानोसा सागरी
वेध सुवर्ण मासळी
थेंब पाझरे स्वातीचा
बने शिंपल्यात मोती

घेता कानोसा क्षणांचा
काही लागतेच हाती
साऱ्या जुन्या आठवांची
मोती भारलेली माती

घेता कानोसा मनाचा
दिसे स्वप्नांचेच जाळे
क्षणी दाटतो काळोख
क्षणी अंबर उजळे

आता कानोसाच फक्त
हाती उरल्या क्षणांचा
आयुष्याच्या संध्याकाळी
मनी उरल्या स्मृतींचा

२४/०९/२१

## ५. मजेत गावे

मजेत गावे सुरेल गाणे
विसरून सारे दर्द दिवाणे

आयुष्याच्या रस्त्यावरती
ऊन्ह सावली असे सोबती
सावलीस मग धरून हाती
ऊन्हास घालीत नवे उखाणे
मजेत गावे सुरेल गाणे

मनासारखे कधीच येथे
कुणा न सारे येथे मिळते
जे मिळाले गोड मानूनी
गमावलेले विसरून जाणे
मजेत गावे सुरेल गाणे

विसरून साऱ्या व्यथा वेदना
दूर सारूनी सगळ्या चिंता
सूर शोधूनी नव्या गीताचे
छेडीत जावे रोज तराणे
मजेत गावे सुरेल गाणे

०२/१०/२१

## ६. मौनाचे स्वर

मौनाचे स्वर कंठी जुळले
अन् गीत नव्याने उलगडले
स्फुरले जे मग शब्दांवाचून
गीत मनाने गुणगुणले

मौनाचे स्वर कंठी जुळले
शब्द मनी का अडखळले
सांगितले जे  नजरेमधूनी
भाव तयातून उलगडले

मौनाचे स्वर कंठी जुळले
सारे तनमन गुणगुणले
तार छेडली नकळे कुठली
सप्तस्वर मग दरवळले

मौनाचे स्वर कंठी जुळले
नकळत सारे उलगडले
भाव मनीचे नभात दिसले
झंकारत मन लखलखले

१९/०८/२१

## ७. थेंबकळया पावसाच्या

थेंबकळया पावसाच्या बहरल्या मनात
गंध वादळाचे भरले दाटल्या नभात

गंध ओल मातीचा हा मनी दाटलेला
चिंब चिंब साज उरला उरी भारलेला
इंद्रधनू साकारे या ऊन्ह पावसात
थेंबकळया पावसाच्या बहरल्या मनात

धार पावसाची त्याला साथ वादळाची
धुंद आठवांच्या संगे नदी आसवांची
तोकडा किनारा माझा तुटे वादळात
थेंबकळया पावसाच्या बहरल्या मनात

मेळ कधी जमतो येथे ऊन पावसाचा
सोबतीस उरतो माझ्या खेळ संचिताचा
लपंडाव चाललेला दिसे ना मनात
थेंबकळया पावसाच्या बहरल्या मनात

थेंबकळया पावसाच्या बहरल्या मनात
गंध वादळाचे भरले दाटल्या नभात

१३/०६/२१

## ८ . आता न कुठली भीती

तेल दिव्यातील संपत आले
विझू लागल्या वाती
काळोखाच्या हमरस्त्यावर
आता न कुठली भीती

दिवसभराचा प्रवास सरला
सांजावत आले
नभांगणातील पक्षी आता
घरट्याशी आले
मावळणाऱ्या भास्करास ना
आता कसली क्षिती

कातरवेळी अवचित यावे
नयनी का पाणी
सूर कालचे मनात घुमवी
आठवणींची गाणी
फिरती आता फेर धरूनी
संध्याछाया भवती

उजाडता हा दिवस मनाशी
होते माझ्या काही
आयुष्याच्या  सायंकाळी
मनी न उरले काही
मौनाशी संवाद सांधती
आयुष्याच्या भिंती

तेल दिव्यातील संपत आले
विझू लागल्या वाती
काळोखाच्या हमरस्त्यावर
आता न कुठली भीती

१६/०३/२१



## ९. संगत

अंत न याचा कधी कुणाला
कोणालाही ठाऊक नसतो
आयुष्याची संगत घेऊन
प्रवास आपला चालू असतो

कधी हवीशी मिळते संगत
आयुष्याला येते रंगत
कधी नकोशी होता सोबत
होते आयुष्याची फसगत

कुठली सोबत दोन क्षणांची
संगत कुठली युगायुगांची
कधी न उमगे ललाटरेषा
लिहीली आपुल्या भाळावरची

वाटेमधले खाच खळगे
सोबतीलाही ठाऊक नसती
संगतीतल्या वाटेमधे
विचित्र वळणे खूपच असती

कधी कोणत्या वळणावरती
संगत आपली संपत असते
काहीच नाही पुढे जेथूनी
अशा ठिकाणी थांबत असते

तिथून पुढच्या वाटेवरती
कुणा कुणाची संगत नसते
पावलांचे ठसे मागुती
निघून जायचे पुढेच असते

२४/०९/२०



## १०. पाखरू

कुणी सांगतं, कुणी नाही
कुणी लपवतं मनात
भिरभिरणारं एक पाखरू
असतं प्रत्येकाच्याच मनात

कधीतरी, कुठेतरी,  कुठूनतरी येतं
मनामधेच कुठेतरी  घरटं आपलं बांधतं
कळत नाही हाकलून द्यावं की
राहू द्याव मनात
भिरभिरणारं एक पाखरू
असत प्रत्येकाच्या मनात

मनामधल नभ आणी  मनामधलंच अंगण
सगळच त्याला द्याव लागतं भेटीमधे आंदण
वळचणीला कधी बसतं
कधी झेपावत नभात
भिरभिरणारं एक पाखरू
असतं प्रत्येकाच्याच मनात

कधी  गातं गाणं  तर  कधी टोच मारतं
कधी मनाला सांभाळतं तर कधी दूर लोटतं
उमजत नाही काय आहे
कधी त्याच्या मनात
भिरभिरणारं एक पाखरू
असत प्रत्येकाच्याच मनात

कधी सकाळी हाळी देतं  प्राचीच्या अंगणात
कधी दूर दूर उडतं सांजावलेल्या नभात
हळूच येऊन बसतं परत
मनामधल्या झुल्यात
भिरभिरणारं एक पाखरू
असत प्रत्येकाच्याच मनात

पाखरू म्हणजे  दडलेलं मनामधलं मन
मनाला समजवणारं आपलच असतं मन
तरीसुध्दा उमगत नाही
काय त्याच्या मनात
भिरभिरणारं एक पाखरू
असतं प्रत्येकाच्याच मनात
०७/०९/२०



## ११. नाही धर्माचा आचार

नाही धर्माचा आचार नाही कर्माचा विचार
कसा सरावा मनात  कधी लपला विकार

पाप काय पुण्य काय नाही कधी समजले
भले बुरे वागतांना मन नाही  सावरले
नाही टाळला कधीही  देह धर्म व्यवहार
कसा सरावा मनात कधी लपला विकार

सारे संचित गाठीचे गेले कधीच सरून
आता प्रारब्धाचे भोग उभे प्राक्तन होऊन
नाही सोबत कुणाची  पैलतीर दिसे दूर
कसा सरावा मनात कधी लपला विकार

पुण्य शोधीत फिरलो  पाप सहज भेटले
नको नको म्हणतांना  कसे गळ्यात पडले
आता धर्म अधर्माचा  मन करते विचार
कसा सरावा मनात कधी लपला विकार

नाही धर्माचा आचार नाही कर्माचा विचार
कसा सरावा मनात कधी लपला विकार

२८/०२/२१

## १२. सर्कस

आयुष्याचा विशाल तंबू
जीवन त्यातील असते सर्कस
षड्रिपुंचे प्राणी त्यातील
करीत असती सदैव कसरत
विवंचनांचे सदैव ओझे
ऊंच आपुल्या शिरी घेऊनी
डौलदार ते चालत असते
तोल आपला सतत सावरूनी
कधी होऊनी जीवन उलटे
हातांवरती चालत असते
अनेक चेंडू एकावेळी
अलगद फेकत झेलत असते
सभोवतीने चक्र मृत्यूचे
सदैव त्याच्या फिरतच असते
शिताफीने चुकवीत फेरे
अभिवादन ते करीत असते
मनात त्याच्या एक विदूषक
सदैव दडूनी बसला असतो
कोलांटी उडी मारुनी
हसवत त्याला नित्य ठेवतो
एक मुखवटा सदा मुखावर
हासण्याचा तो ठेवत असतो
आगतिक होतो अश्रू जेव्हा
हासण्यात तो लपवीत असतो
आयुष्याचा विशाल तंबू
जीवन त्यातील असते सर्कस १३/०६/२१

## १३. डोह

देहाचा हा डोह
मनी डहुळतो
तरंग उठतो
तळापास।

पापाची चाहूल
पुण्याची ही भूल
रेंगाळे सतत
आसपास।

धर्म कर्म आणी
प्रपंचाचा भार
पेलवेना आता
आयुष्यास।

तिष्ठतो अजूनी
भक्तीच्या दाराशी
ठेऊन मनाशी
मोहपाश।

तरी या देहास
मुक्तीचीच आस
जीव व्यर्थ होतो
कासावीस।

देहाचा हा डोह

मनी डहुळतो
तरंग उठतो
तळापास
तळापास ॥

१५/११/२१



## १४. स्वप्न

दूरदूर क्षितीजाशी
स्वप्न एक तरळते
कुणी अनाम पाखरु
शीळ तिथे घुमवते

प्रकाशाचा पदरव
मंद कानावर येतो
उगवत्या दिवसाशी
मुका संवाद साधतो

क्षितीजाशी पाहीलेले
स्वप्न मनात लपते
आणी कातरवेळेची
वाट पाहात थांबते

०४/०६/२१

## १५. आभाळ साक्ष

झाले निरभ्र आकाश
आला प्रकाश प्रकाश
गेले निघूनिया दूर
मनी साचले मळभ

काही साचले मनात
नाही मांडले शब्दात
साऱ्या शब्दांनीच होती
दूर सारली ओळख

आज अचानक मनी
शब्द आलेला धावत
सूर सामावत नभी
आकारले एक गीत

गीत आकारास येता
शब्द सारे नादावले
नभ उजळून आले
साक्षी आभाळ उरले

१३/०६/२१

## १६ . जिप्सी

कधी कधी वाट सोडून
अनवट वाटेनं चालावं
मनामधलं गुणगुणणं
ओठांवरही आणावं
वाटलं तर कधी कधी
मुक्तपणे हसावं
वाटलं तर मोठ्यानं
कधी कधी रडावं
शहाणपण बाजूस ठेऊन
वेड्यागत कधी वागावं
वाटलं तर अधुन मधुन
मनमुराद नाचावं
नेहेमीच कसं बरोबर वागणार
कधी कधी चुकावं
चुकलकी आपल्यावर
आपणच हसावं
कोण काय म्हणेल असा
विचार न करता जगावं
आयुष्याच्या प्रवासात
जिप्सी होऊन भटकावं

२०/०५/२०१८

## १७. ऐल नाही

जीवनाला ऐल नाही
जीवनाला पैल नाही
बंध हे तोडू पाहातो
एवढेही सैल नाही

जीवनाला खेद नाही
जीवनाला खंत नाही
एवढे हे भोगणे की
भोगण्याला अंत नाही

जीवनाला रूप नाही
जीवनाला रंग नाही
थांबलेल्या या क्षणांना
जीवनाचा संग नाही

जीवनाला आस नाही
जीवनाला ध्यास नाही
जीवनात आज उरला
कोणताही श्वास नाही

२४/११/१८

## १८. सदैव असतो

सदैव असतो
आपल्या सोबत
तो श्वासही
आपला नसतो
कुणास ठाऊक
कसा न ठाऊक
कुठवर सोबत करतो

२९/११/२१



## १९. बंद बंद असते

आठवणींचे दार आताशा
बंद बंद असते
कुणी न येते आत तयातून
बाहेर कुणी ना जाते

कधीकाळच्या अस्तीत्त्वाच्या
आत लपल्या खुणा
स्मरणातही ना आज कुणाच्या
उरल्या पाऊलखुणा
जुनी पुराणी उदास छाया
परी भिंतीवर उरते
आठवणींचे दार आताशा
बंद बंद असते


मृण्मय सारी विरघळली अन्
भिंती उघड्या पडल्या
वीट वीट ती दिसू लागली
दिसू लागल्या खपल्या
मनात तरीही भग्न वास्तुच्या
स्वप्न कालचे लपते
आठवणींचे दार आताशा
बंद बंद असते
कुणी न येते आत तयातून
बाहेर कुणी ना जाते

१३/०९/२१

## २०. मेघ

क्षितीजात उमटते रेघ
मग मनी उतरतो मेघ
आकाश उमलते थोडे
अन् प्रकाश धावत येतो
क्षितीजात थबकतो सूर्य
अन् समीर वाहतो मंद
मेघाशी लगटून तेव्हा
धावतो.... एक मृद्गंध
मग मेघच बनून दूत
संदेश दूरचा देतो
अन् तापल्या धरेला
क्षण एक आपला स्मरतो

१९/०९/२१



## २१. किनार ओली होती

नभ उतरून आले होते
अन् सांज पेंगली होती
झुकलेल्या पापणीची का
ती किनार ओली होती

नभ दाटुन आले होते
मेघांची भवती दाटी
झुकलेल्या पापणीची का
ती किनार ओली होती

नभ बरसून गेले होते
आषाढ श्रावणासंगे
झुकलेल्या पापणीची का
ती किनार ओली होती

साऱ्याच क्षणांच्या भवती
विरलेली एक कहाणी
झुकलेल्या पापणीची का
ती किनार ओली होती

१३-०६-२१

## २२. हळवे सुगंध

हळवे सुगंध सजवावे
तना मनाला भिजवावे
आयुष्याने गत काळाच्या
आठवणीतच विहरावे

हळवे सुगंध सजवावे
क्षणा क्षणांना उकलावे
मनात फुलल्या पुष्पकळयांचे
अत्तर शिंपण उधळावे

हळवे सुगंध सजवावे
मनात वेड्या रुजवावे
आयुष्यातील विकल क्षणांना
सूर संगीती खुलवावे

२९-०७-२१

## २३. मैत्री

मैत्री म्हणजे छेडलेला
एक स्वैर सूर असतो
मैत्री म्हणजे आयुष्याचा
एक भक्कम आधार असतो

मैत्री म्हणजे आयुष्यातला
नकळत जुळलेला योग असतो
मैत्री म्हणजे आयुष्यातला
हवाहवासा भोग असतो

मैत्री म्हणजे गतजन्मीचे
साठवलेले पुण्य असते
पुढील जन्मी लाभावे म्हणून
या जन्मीचे संचित असते

मैत्री म्हणजे आयुष्याच्या
संगीताची सुरावट असते
मैत्री म्हणजे शब्दांशिवाय
अर्थपूर्ण गाणे असते

०१-०८-२१

## २४. झुला

झुला बांधला झाडाला
झोका चढला आकाशी
गुज माझीया मनीचे
कुणी बोलते कानाशी
साऱ्या तळहातांवर
आहे श्रावण रंगला
साऱ्या आठवणी जुन्या
मेंदीभरल्या सजल्या
आठवांच्या झुल्यावर
आज मन हे झुलते
ऊंच जाता आकाशात
मन अंबरी खुलते

१३-०८-२१

## २५. वर शांत शांत

वर शांत शांत तरीही दरीया मनात आहे
दिसते न लाट तरीही कानात गाज आहे

उद्रेक तो मनीचा ना जाणवे कुणाला
लाव्हा परी मनीचा उसळून येत आहे

भवताल शांत शांत निःशब्द शब्द शब्द
कल्लोळ तो तरीही उठतो मनात आहे

ना बोलतो कुणाशी आपल्याही ना मनाशी
तरी द्रोह हा मनाशी आपलाच नित्य आहे

शब्दात वैखरीच्या कुठलाच भाव नसतो
तरीही मनात लपला एकेक ग्रंथ आहे

२१-०८-२१



## २६. नितांत

नितांत आता निवांत आता
सुशांत आणी सुखात आता

गोंधळ गडबड दूर सारली
किल्मीषेही सारी सरली
मनी किंतु ना कुठला आता
नितांत आता निवांत आता

दूर सारता साऱ्या शंका
मनी न कुठली उरे आशंका
प्रशांत पुढचा प्रवास आता
नितांत आता निवांत आता

मनातल्या त्या सरता गाठी
प्रारब्धाच्या विरतील गाठी
मनाभोवती वसे शांतता
नितांत आता निवांत आता

ऐहिकतेची सुटता नाती
नितांत सुंदर जग हे भवती
दिक्कालाचा प्रवास आता
नितांत आता निवांत आता
सुशांत आणी सुखात आता

२३-०८-२१

## २७. रांगोळी

आयुष्याच्या रांगोळीत
बालपणी ठिपकेच होते
नंतर ओढल्या काही रेषा
काही सरळ काही वाकड्या
काही सुरेख काही कुरेख
काही रंग खुलले
कळलच नाही
काही रंग विस्कटले
समजलच नाही
वाकड्या रेषा पुसुन टाकल्या
अगदी सरळ...सरळ केल्या
रंगही नीट छान भरले
अंगण परत छान सजले
घरासारखच मनालाही
एक अंगण आपल्या असतं
अल्पनेची एक रेघ
कल्पनेशी जुळवून घेत
रंगभरली करायची असते
रांगोळीच्या रेषांनी
अंगण रोज
सजवायचे असते

२९-१२-२१

## २८. छाया

कधी सोबतीस प्रकाशछाया
कधी साथीला संध्याछाया
अखेर सोबत करीत असते
पायांखालील आपली छाया

प्रेमळ छाया कधी हरवते
चांदण छाया हळूच सरते
आर्त खिन्नता छाया होऊन
अखंड सोबत हळवी करते

कधी व्याधीची छाया सोबत
कधी हसवते कधी रडवते
उदासवाणी  छाया हासत
कधी मनाला खिन्न फसवते

हवीहवीशी हिरवी छाया
सोबत जेव्हा करीत असते
हवीहवीशी स्वप्नील छाया
मनात वेड्या जागी असते

जेव्हा सरती साऱ्या छाया
गुरूकृपेची मिळते छाया
सरतील साऱ्या व्यथा वेदना
कुठे मोह अन् कसली माया

१३-११-२१

## २९. अथांग सागर

पुढे पसरला अथांग सागर
नाही कुठला दुसरा वावर
जिथवर जाईल नजर तेथवर
तरंग असती जलाशयावर

समोर दिसते क्षितीज दूरवर
जलात लपला तेजस भास्कर
प्रतीबिंबासह नभ हे कातर
उदकी खुलले रूप मनोहर

अथांग सागर अथांग वावर
ना भूमीचा दिसे कुठे थर
मनात हुरहुर उठली कातर
विश्वेशाचे रूप अनावर

परमार्थाचा अथांग सागर
जीवननौका डुले तयावर
लंघून लाटा अडसर खडतर
जाण्या शाश्वत पैलतीरावर

पुढे पसरला अथांग सागर
पुढे पसरला अथांग सागर

२०-१२-२१

## ३०. स्वर गहिवरला

मालवतांना दिवा जरासा
दिवा जरासा जरा थरथरला
अन् संध्येचा स्वर गहिवरला

आठवतांना प्रकाश आपला
जरा कवडसा मनात दिसला
अन् संध्येचा स्वर गहिवरला

कधी हरपला कुठे हरवला
उजेड सारा मनात लपला
अन् संध्येचा स्वर गहिवरला

आता शोधतो घन तिमीरातच
प्रवास सारा कधी संपला
अन् संध्येचा स्वर गहिवरला

मालवतांना दिवा जरासा
दिवा जरासा जरा थरथरला
अन् संध्येचा स्वर गहिवरला

१५-०७-२१
***

## शिरीष पुरूषोत्तम मोराणकर



जन्म(२९/०८/१९५४), शालेय व महाविद्यालयीन शिक्षण मालेगाव व सटाणे (जि. नासिक) येथे.
१९७६ ते २०१४ पर्यंत युनियन बँक ऑफ इंडीयात नोकरी आणि २०१४ साली निवृत्त.
सध्या कल्याण येथे वास्तव्य.
वाचनाची आवड लहानपणापासूनच. कुठलाही लिखाणाचा प्रकार वाचनासाठी वर्ज्य नाही. त्यातल्यात्यात  कथासंग्रह आणि अर्थातच काव्यसंग्रह हे जास्त भावतात. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, पु.ल. देशपांडे, अरूण साधू, जी. ए. कुलकर्णी, चि. त्र्यं. खानोलकर, कुसुमाग्रज, बालकवी, मंगेश पाडगावकर, सुरेश भट, गो.नि. दांडेकर, रॉय किणीकर, सुधीर मोघे हे आवडते साहित्यिक आणि पाडगावकर, सुरेश भट यांचा विशेष प्रभाव.
"मनोगत" हा चारोळी संग्रह आणि "अस्वस्थ मनाच्या ओळी" हा कवितासंग्रह प्रकाशित.
डोंबिवली येथील मोहिनीराज प्रकाशनाच्या डिसेंबर २१ ला प्रकाशित झालेल्या प्रातिनिधीक काव्यसंग्रहात बारा कवितांचा समावेश.

शिरीष पुरूषोत्तम मोराणकर

बी-३/१०२,इंद्रप्रस्थ संकुल
गोल्डन पार्क फेस २ मागे
बेतुरकरपाडा, कल्याण (पश्चिम), ४२१३०१
९९२०६०११३७
shirish.morankar@gmail.com

चंद्र, फुले, मृग, तारे येती
जसे धरित्रीवर
तशी कविता रिझवित येते
ई साहित्यावर

खुप साऱ्या कविता वाचण्यासाठी
आपल्या सुंदर कवितांचा आनंद
इतरांना देण्यासाठी

ई-मैफ़ल

www.esahity.com
esahity@gmail.com
9987737237(Whatsapp)